ठाणे महानगरपालिका,ठाणे
क्र.ठामपा/आस्था/पऑ/आयुक्त- ६९३८
दिनांक. 9/2/2013

**वाचले:-** ठामपा/आस्था/पऑ/आयुक्त-४४३८ दि.२७.११.२०१२ ची निवड यादी.

**आदेश :-**

ठाणे महानगरपालिकेच्या आस्थापनेवर पूर्व प्राथमिक व माध्यमिक विभागाकडे कायमस्वरुपी विनाअनुदानीत उर्दू माध्यमाच्या शाळेसाठी "शिक्षण सेवक" या संवर्गातील अस्थायी पदांवर खालील उमेदवारांची निम्नलिखित अटी व शर्तीवर दर महा एकत्रित वेतनावर प्रथम तीन वर्षासाठी नियुक्ती करण्यांत येत आहे.

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | प्रवर्ग | पदनाम | जात वैधता प्रमाणपत्र आहे/नाही |
|---|---|---|---|---|
| १ | सय्यद नादिरा अहमद | अनु.जमात | शिक्षण सेवक (ऊर्दु भुगोल) | नाही |

**अटी व शर्ती :-**

१ उमेदवारांची नेमणूक जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्याच्या अटीस अधिन राहून "शिक्षण सेवक" पदासाठी सहा महिन्याच्या निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात दरमहा रु.८०००/- मासिक मानधनावर करण्यांत येत आहे.

**अ)** सदरची नेमणूक शासन परिपत्रक सामान्य प्रशासन विभाग,क्र.बीसीसी २०११ /प्र.क्र.१०६४/२०११/१६-ब, दिनांक १२ डिसेंबर २०११ अन्वये जात वैधता प्रमाणपत्र सादर करणेच्या अटीस अधिन राहून करण्यात येत असून जात वैधता प्रमाणपत्र सहा महिन्याच्या आत सादर न केल्यास त्यांची नियुक्ती संपुष्ठात येईल.

**ब)** नेमणूक कालावधीत काम असमाधानकारक आढळुन आल्यास महापालिकेस त्यांची नेमणुक रद्द करता येईल.

२. शिक्षणसेवक म्हणून आपली नियुक्ती संस्थेच्या कोणत्याही माध्यमिक शाळेत केली जाईल.

३. नियुक्तीच्या कालावधीमध्ये संबधितांनी कोणत्याही स्वरुपाची गैरवर्तणूक केल्यास, त्यांची नियुक्ती रदद् करण्यात येईल.त्यासाठी नियुक्तीपत्रातील कालावधी बंधनकारक राहणार नाही.

४. नियमित स्वरुपात नियुक्त केलेल्या शिक्षकांच्या किंवा शासकीय कर्मचा-यांच्या सेवा-सुविधा आपणास देय असणार नाहीत.

५. उमेदवाराने नेमणूकीच्या आदेशाच्या तारखे पासून ३० दिवसांच्या आत नेमणूकीच्या ठिकाणी हजर होणेचे आहे उक्त मुदतीत हजर न झाल्यास त्यांची नियुक्ती रद्द करण्यात येईल व पुन्हा त्यांना नोकरीबाबतचा दावा करता येणार नाही.

६. शिक्षणसेवक या पदावर तीन वर्षे समाधानकारक काम केल्यानंतर नियमानुसार अटी व शर्तीची पुर्तता होत असल्यास आपणास शिक्षकाच्या नियमित वेतनश्रेणीत नियुक्ती देण्यास पात्र ठरविण्यात येईल. तदनंतरच आपण शिक्षणसेवक म्हणून केलेली सेवा सेवानिवृतीवेतन किंवा सेवानिवृतीनंतरचे फायदे यासाठी ग्राहय धरली जाईल.

७. संबधितांस "शिक्षणसेवक" म्हणून हमीपत्रातून मुक्त व्हावयाचे असल्यास त्यांनी त्यांच्या शाळा प्रमुखामार्फत किमान ३० दिवसाची पुर्वसुचना त्यांच्या नियुक्ती प्राधिका-यास देणे अथवा ३० दिवसांच्या मानधनाची रक्कम नियुक्ती प्रधिका-याकडे जमा करणे आवश्यक राहील. संबधितांनी विहित मुदतीत तशी पूर्वसूचना न दिल्यास अथवा मानधनाची रक्कम जमा न केल्यास त्यांस पुन्हा कधीही शिक्षणसेवक म्हणून नियुक्ती देण्यात देणार नाही.तसेच मानधनाची रक्कम नियमानुसार वसुल करण्यात येईल.

८. जात वैद्यता प्रमाणपत्र सादर करण्याच्या अटीस अधीन राहून नियुक्त केलेल्या उमेदवाराने ठाणे महानरपालिकेच्या पुर्व प्राथमिक व माध्यमिक शिक्षण विभागाकडे जात वैद्यता प्रमाणपत्र प्राप्त करण्यासाठी विहित नमुन्यातील अर्ज व आवश्यक कागदपत्रे सादर करावीत व तद्नंतर नियुक्तीच्या ठिकाणी हजर व्हावे.

९. उमेदवाराची नेमणूक अर्जदाराची मुळ अर्जातील माहिती , अर्जात सादर केलेली शैक्षणिक अर्हता, वय, इत्यादी बाबतची कागदपत्रे / प्रमाणपत्रे तात्पुरत्या स्वरुपात ग्राह्य धरुन सदर नेमणूक करण्यात येत असून संबधितांनी सादर केलेली कागदपत्रे / प्रमाणपत्रे खोटी आढळल्यास त्याची सेवा तात्काळ संपुष्टात आणण्यात येईल व त्यानंतर कायदेशीर कारवाई केली जाईल.

१०. उमेदवारांना नेमणुकीच्या ठिकाणी हजर होताना कोणत्याही प्रकारचा प्रवास खर्च दिला जाणार नाही.

११. नेमणूक झालेल्या उमेदवारांने महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटूबांचे प्रतिज्ञापत्र ) नियम २००५ मधील तरतुदी बंधनकारक राहतील त्यांनी विहीत नमुन्यात (नमुना -अ )मध्ये प्रतिज्ञा पत्र कार्यालयाकडे सादर करणे आवश्यक राहील.

१२. महाराष्ट्र शासन वित्त विभाग,शासन निर्णय क्र.अनियो-१००५/१२६/सेवा-४, मत्रालय, मुंबई. दिनांक ३१ ऑक्टोबर २००५ नुसार ठाणे महापालिकेच्या सेवेत दिनांक २५ जुलै २००७ नंतर नियुक्त होणा-या कर्मचा-यासांठी सद्या अस्तित्वात असलेल्या निवृती वेतन ऐवजी केंद्र शासनाच्या धर्तीवर नविन "परिभाषित अंशदान निवृती वेतन योजना " लागू करण्यात येईल

१३. ठाणे महानगरपालिका कर्मचा-यास लागु असलेल्या सर्व सेवा शर्ती उमेदवारास बंधकारक राहतील.

१४. उमेदवाराच्या अपात्रते विषयाची बाब कोणत्याही वेळी निदर्शनास आल्यास त्यास कोणतीही नोटीस न देता त्याची नियुक्ती तात्काळ रद्द् करण्यात येईल.

१५. संबधित आस्थापना प्रमुखाने (शाळेच्या मुख्याध्यापकांनी)उमेदवार पदस्थापनेच्या ठिकाणी हजर झाल्या नंतर त्याचे कडून नोकरीचा जामीन कदबा, नामनिर्देशन भरुन सेवा पुस्तक तयार करणे आदी बाबीची पुर्तता करुन घ्यावयाची आहे.

१६. उमेदवाराची नियुक्ती खेळाडू या समांतर आरक्षणात झाली असेल अशा उमेदवाराचे खेळाबाबतचे प्रमाणपत्र मा.आयुक्त क्रिडा व युवक सेवा पुणे यांचेकडील वैद्यता प्रमाणपत्र प्राप्त केल्या खेरीज त्यांना नियुक्तीच्या ठिकाणी हजर करुन घेण्यात येणार नाही.

१७. संबधित कर्मचा-याचे वेतन त्याचे नियुक्ती केलेल्या ठिकाणी काढण्यात येईल

१८. उमेदवाराचे पोलिस यंत्रणेकडील पुर्व चारित्र पडताळणी प्रमाणपत्र प्राप्त झाल्याची खातर जमा केल्यानंतरच विभाग प्रमुख, पुर्व प्राथमिक व माध्यमिक शिक्षण विभाग यांनी उमेदवारास हजर करुन घ्यावे.

१९. सदर आदेशान्वये हजर झाल्याबाबतचा अहवाल उमेदवारांने विभाग प्रमुख,पुर्व प्राथमिक व माध्यमिक शिक्षण विभाग यांचे मार्फत उपआयुक्त (मुख्यालय) यांजकडे तसेच मुख्य आस्थापना शाखेकडे सादर करणे आवश्यक आहे.

२०. उमेदवाराने नेमणूकीच्या ठिकाणी हजर होणेपुर्वी पुर्व चारित्र व वर्तणूकीबाबत पोलिस यंत्रणे मार्फत प्रमाणपत्र ठामपा कार्यालयास प्राप्त झाल्याची नोंद तसेच शैक्षणिक पात्रता, वय, जात, सक्षम प्राधिकारी यांचे कार्यालयाकडील जातीचा दाखला व वैधता प्रमाणपत्र इत्यादी प्रमाणपत्राच्या प्रती सादर कराव्यात तसेच मुळ प्रमाणपत्रेही संबधित विभाग प्रमुखास दाखविणेंत यावीत तद्नंतरच संबधित विभाग प्रमुखाकडून उमेदवारास हजर करुन घेण्यात येईल.

२१. नियुक्तीच्या कालावधीत संबंधित शिक्षण सेवकांना खालील कर्तव्ये पार पाडावी लागतील.

- विद्यार्थ्याची शाळांतील उपस्थिती टिकविण्याच्या दृष्टीने पालकांशी संपर्क ठेवणे.
- शाळेत दररोज संपूर्ण शालेय कालवधीमध्ये नियमित व वेळेवर उपस्थित राहणे.
- अभ्यासक्रमामध्ये नमूद केल्याप्रमाणे आवश्यक ते शैक्षणिक साहित्य निर्माण करणे.
- नेमून दिलेल्या विषयांचे विहित कार्यपध्दतीनुसार अध्यापन करणे.
- शासनाने आवश्यक केलेल्या प्रशिक्षणास उपस्थित राहणे.

- शाळेचे मुख्याध्यापक यांच्या नियंत्रणाखाली काम करणे व शैक्षणिक तथा प्रशासकीय बाबींबाबत त्यांच्या आदशांचे पालन करणे.
- वर्गातील विद्यार्थ्यांचे सातत्यपुर्ण व सर्वंकष मुल्यमापन करणे.
- शैक्षणिक व इतर उपक्रमांच्या (क्रिडा स्पर्धा,वक्तृत्व स्पर्धा,इत्यादी ) आयोजनामध्ये सहभागी होणे.
- महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने सुचविल्याप्रमाणे परीक्षाविषयक कामे पार पाडणे.

महापालिका आयुक्त
ठाणे महानगरपालिका ठाणे

प्रत :- संबधित उमेदवार

प्रतः- मा.महापौर, मा.उपमहापौर, मा.सभापती स्थायी समिती, मा.सभागृह नेता, मा.विरोधी पक्षनेता यांजकडे माहितीसाठी सादर

प्रतः- अतिरिक्त आयुक्त, उप आयुक्त (मुख्यालय) यांचेकडे माहितीसाठी
महापालिका आयुक्त यांचे स्विंय सहाय्यक यांजकडे माहितीसाठी
खाते प्रमुख
(मुख्य आस्थापना विभाग, वेतनबिल लिपिक, कार्मिक विभाग, संबधीत संवर्ग लिपीक,आस्थापना सूची लिपिक, लेखाशाखा, लेखापरिक्षण विभाग, मागासवर्ग कक्ष, संगणक विभाग, पुर्व प्राथमिक व माध्यमिक शिक्षण विभाग, विधी विभाग )
समनवय अधिकारी,नागरी सुविधा केंद्र यांचेकडे संकेंत स्थळावर प्रसिध्दीसाठी